राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

तक्रार क्र.रामाआ -३३८/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अनिल दत्तात्रय अंदे | कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं. मर्या, प्रादेशिक कार्यालय, पुणे | अधिक्षक अभियंता, म. रा. वि. वि. कं. मर्या, प्रादेशिक कार्यालय, पुणे |

<u>तकार अर्ज सुनावणी दि.४-९-२०२४</u>

तक्रारदार यांनी दि.०८/०५/२०२३ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज केला आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, त्यामुळे नियमानुसार कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

सुनावणीचेवेळी तक्रारदार हजर होते, उत्तरवादी गैरहजर होते.

सुनावणीचेवेळी तक्रादार यांनी सुचित केले की, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल क्र.७५५१/२०२३ दाखल केले होते, त्यामध्ये आयोगाने सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, अर्जदाराने याच माहितीच्या अनुषंगाने आयोगाकडे तक्रार अर्ज व द्वितीय अपिल दाख्ल केले होते. आयोगाने द्वितीय अपिल क्र.७५५१/२०२३ मध्ये २५/०७/२०२४ रोजी आदेश पारीत केलेले आहेत. या परिस्थितीत प्रस्तूत तक्रार अर्जावर नव्याने आदेश पारीत करण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश.

अर्जदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 4902/2024 दिनांक - 12/9/2024